## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शनिवार दि. ५/१२/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२१ वी बैठक शनिवार दि.०५.१२.२००९ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| २) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| ४) | श्री. जी.डी.जैस्वाल | सहमुख्य अधिकारी |
| ५) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री. बशीर पटेल | सदस्य |
| १६) | मा.श्री.नंदकुमार काळे | सदस्य |
| १७) | मा.श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| १६) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १८) | श्री. अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. उपसभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री. देशमुख्य यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांचे स्वागत करुन आजची बैठक मा. उपसभापती श्री. सुभाष हजारे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे असे निदर्शनास आणून मा. उपसभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२१/१**

विषय- दि.२०/०८/२००९ रोजी झालेल्या १२० व्या बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ७ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. किसन बा. जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत संक्रमण शिबीरातील गाळे कोणाला वितरीत केले आहेत त्यांची नावे व फोटो इ. माहिती ज्या

ठिकाणी संक्रमण शिबीराची कार्यालये आहेत अशा ठिकाणच्या संक्रमण शिबीरात प्रथम लावण्याबाबत सूचना केली होती त्या सूचनेची अंमलबजावणी सुरु झाली का ? अशी विचारणा केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी याबाबत काय कार्यवाही केली आहे त्याची माहिती द्यावी अशी सूचना केली असता श्री. पवार, का.अ यांनी माहिती दिली की, अधिकृत व अनधिकृत गाळेधारक यांची पाहणी चालू आहे.व यादी बनविण्याचे काम चालू आहे.व गाळेधारकांचे फोटो ताबडतोब मिळत नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी सूचना दिल्या की, संक्रमण शिबीरातील रहिवाशांची यादी तयार करुन त्यांची फोटोसह यादी फलकावर लावावी. सदर यादीमध्ये एका रकान्यामध्ये रहिवाशाची अधिकृत/अनधिकृत अशी नोंद करावी. ज्या ज्या उपअभियंता यांचेकडे संक्रमण शिबीरे आहेत त्यांनी किमान एक संक्रमण शिबीर तसेच पुनर्रचित इमारतीतील गाळयांपैकी एक इमारत पुढील बैठकीपर्यंत पूर्ण करावी. सदरची कार्यवाही टॅंपरिंग होणार नाही अशा पध्दतीने करावी. सर्व संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी व उपमुख्य अधिकारी (पु.गा.) व (सं.गा.) यांनी या कामाचे स्वतः सनियंत्रण करुन सदर कार्यवाही करुन सर्वांनी पुढील बैठकीत केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी अशी सूचना केली की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची जी नव्याने रचना करण्यात आली आहे त्याबाबत माहिती द्यावी यावर मा. मुख्य अधिकारी यांनी मुं.इ.दु. व पु.मंडळाची जी नव्याने रचना करण्यात आली आहे त्याची माहिती देताना सांगितले की, परिमंडळ-१, परिमंडळ-२, परिमंडळ-३, परिमंडळ-४ अशी चार परिमंडळं तयार करण्यात आली असून त्यावर चार उपमुख्य अभियंता यांची नेमणूक करण्यात आली आहे. कोणत्या परिमंडळासाठी कोणता उपमुख्य अभियंता नेमण्यात आला आहे व त्यांच्याकडे कुठल्या विभागाचे काम आहे तसेच त्यांच्या कार्यालयात कोणते अधिकारी नेमले आहेत याबाबतची लेखी माहिती सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. पुनर्रचित इमारतीतील तसेच संक्रमण शिबीरातील गाळयांचा ताबा देण्याची कार्यवाही ही कार्यकारी अभियंता यांचेमार्फत होईल. त्यामुळे यापुढे पुनर्रचित तसेच संक्रमण शिबीरातील गाळयांमध्ये घुसखोरी होणार नाही, याची कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी व त्यांच्याकडे येणा-या तक्रारींचे निरसन त्वरित करतील. पुनर्रचित इमारती/ संक्रमण शिबीरासंबंधातील विविध संदर्भातील अहवाल कार्यकारी अभियंता यांचेमार्फत पाठवावयाचे असल्याने भाडेवसुलीकारांवर दैनंदिन नियंत्रण हे उपअभियंता/कार्यकारी अभियंता यांचे राहील. पुनर्रचित इमारतीतील तसेच संक्रमण शिबीरातील गाळयांच्या देखभाल व दुरुस्तीवर उपअभियंता/कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण राहील.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी सर्व सन्मा. सदस्यांचे वतीने या नवीन संरचनात्मक कार्यप्रणालीमध्ये केलेल्या बदलाचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीस तयार करण्यात येणार होती असे निदर्शनास आणून लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीसचा नमुना तयार असल्यास तो दाखविण्यात यावा अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी यांनी ही सर्व माहिती अंतिम करुन लॅमिनेटेड व्हेकेशन नोटीसचा नमुना पुढील बैठकीत दाखविण्यात यावा असे सांगितले.

मा. सदस्य श्री.किसन बा. जाधव यांनी मंडळाच्या दुरुस्ती कामांना महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाकडून तोडण्यात येते किंवा स्थगिती देण्यात येते ते योग्य नाही अशाप्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता, असे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, या विषयाबाबत उपमुख्य अभियंता,परिमंडळ-२ यांनी महानगरपलिकेच्या उपायुक्तांशी संपर्क करुन हा प्रश्न सोडविण्याचे ठरले होते असे निदर्शनास आणून पुन्हा असे प्रकार होऊ नयेत म्हणून मंडळ व म.न.पा. यांच्यात समन्वय राखण्याच्या दृष्टीकोनातून अधूनमधून या विषयाबाबत सर्व उपमुख्य अभियंता यांनी महानगरपलिकेच्या उपायुक्तांशी संपर्कात रहावे अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबत मुद्दा मांडला होता. त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, पूर्वी रहिवाशांकडून घेण्यात येणार भाडे भाडेवसुलीकार मंडळाच्या कार्यालयात आणून बँकेत जमा करावयाचे. ही पध्दत बंद करण्यात आली असून जमा करण्यात आलेले भाडे त्या त्या भागातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत जमा करण्यात येत आहे. परंतु बँकेमार्फत भाडेवसुली करण्याची अंमलबजावणी करता आलेली नाही असे निदर्शनास आणून त्यामध्ये येणा-या अडचणीची माहिती मुख्य लेखाधिकारी यांना देण्याच्या सूचना दिल्या. यावर मुख्य लेखाधिकारी यांनी माहिती दिली की, भाडेवसुली करण्याच्या कामाबाबत बँकेने कमिशनपोटी पैशाची व डिपॉझिटची मागणी केलेली आहे. याबाबतचा प्रस्ताव वित्त नियंत्रक प्राधिकरण यांच्याकडे असून त्यांचे मत आहे की, बँकेने डिपॉझिट घ्यावे किंवा पैसे घ्यावेत दोन्ही मागू नयेत. परंतु प्राधिकरणाच्या या मताशी बँक सहमत नसल्यामुळे हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. यावर मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, बँक किती टक्के कमिशन मागते व भाडे वसुलीसाठी मंडळाचा होणारा खर्च किती होतो हे पाहण्यात यावे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, याच पध्दतीने विचार चालू आहे.

मा. सदस्य श्री.बशीर पटेल यांनी त्यांच्या विभागातील दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली नसल्याचे व इ.क्र.२२-२४, इस्त्राईल मोहल्ला ही इमारत पुनर्रचित होऊनही अद्याप गाळे वितरीत करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आणले. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना सत्वर वितरणाची कार्यवाही करण्याबाबत तसेच संबंधित कार्यकारी अभियंता /ब.विभाग यांना देखील आवश्यकतेनुसार मा.सदस्यांनी सूचित केलेली दुरुस्तीची कामे सुरु करण्याबाबतची कार्यवाही त्वरित करावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने मा.सभापती श्री. सचिन अहिर यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती म्हणून १० वर्षे धुरा समर्थपणे सांभाळली व आम्ही सर्व सदस्य हे २ वर्षे त्यांच्याबरोबर होतो. त्यांचेबरोबर काम करताना आम्हाला त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग झाला. आता पुन्हा आमदार म्हणून निवडून आले आहेत व गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. सन्माननीय सदस्य श्री. हरिष सणस यांनी ठरावास अनुमोदन दिले व ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी अशी सूचना केली की, मा. श्री. सचिन अहिर यांना मुं.इ.दु. व पुं. मंडळाच्या कारभाराचा चांगला अनुभव असल्यामुळे व आता राज्यमंत्री, गृहनिर्माण असल्यामुळे मंडळाचे प्रकल्प राबविण्यामध्ये ज्या काही समस्या आहेत त्याबाबत मा. राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयात बैठक आयोजित करुन मंडळाचे प्रश्न मार्गी लावावेत. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळाच्या अधिका-यांना सूचना दिल्या की, ज्या प्रस्तावांवर अद्याप शासन निर्णय प्रलंबित आहे अशा सर्व प्रस्तावांची यादी तयार करावी व मा.राज्यमंत्री महोदय हे अधिवेशन संपल्यानंतर म्हाडाशी संबंधित विषयावर बैठक घेणार आहेत. त्यावेळी सदर प्रस्ताव बैठकीत सादर करावेत. तसेच सर्व सन्माननीय सदस्यांसोबत अशी एक बैठक आयोजित करण्याबाबत मा. राज्यमंत्री महोदयांना विनंती करण्याचे ठरले.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांचा विमा उतरवण्याबाबत त्यांनी मंडळाच्या मागील बैठकांमध्ये सूचना केली होती. त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ? यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, विम्या कंपन्यांशी संपर्क करण्यात आला आला आहे परंतु मंडळास द्यावा लागणारा विम्याचा हप्ता कोटयावधी रुपयांच्या घरात जातो. मागील काही वर्षातील अपघातग्रस्तांची संख्या फार जास्त नाही. अपघातग्रस्तांना शासनाकडून मदत देण्यात येत असते. मंडळाने सुध्दा अपघातग्रस्तांना प्रती व्यक्ती ५०,०००/- रुपयापर्यंत रक्कम द्यावयाची झाल्यास ती साधारणतः रु.१५ ते २० लाखापर्यंत येईल. त्यामुळे विम्या कंपन्यांना काही कोटी रुपयांचा हप्ता देण्यापेक्षा अपघातग्रस्तांना मदत म्हणून काही रक्कम देणे मंडळास परवडणारे आहे. त्यासाठी म्हाडाच्या

निधीमधून काही निधीची अंदाजत्रकात तरतुद करण्याबाबत विचार करता येईल व तसा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी अशी सूचना केली की, सामाजिक कार्य करणा-या संस्थांना संक्रमण गाळयांचे वाटप करण्यात येणार होते त्याबाबत काय कार्यवाही चालू आहे अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी आचारसंहितेमुळे यावर कार्यवाही करता आली नव्हती असे निदर्शनास आणून ठराव झालेला असल्यामुळे ज्या संस्था गाळे वितरणासाठी पात्र ठरत आहेत त्यांना गाळयांचे वितरण करण्याची कार्यवाही सहमुख्य अधिकारी यांनी त्वरित करावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, ब-याच वर्षांपासून जे लहान लहान गाळे पडून आहेत त्या गाळयांची विक्री जाहीरात देऊन करण्यात येणार होती त्याबाबत काय कार्यवाही झाली अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी आचारसंहिता असल्यामुळे कार्यवाही करता आली नव्हती असे निदर्शनास आणून उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना सूचना केली की, त्यांनी गाळयांच्या विक्रीची जाहीरात त्वरित प्रसिध्दीस द्यावी.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, कलम ३३ (७) अंतर्गत पुनर्विकसित झालेत इमारतीतील अतिरिक्त गाळयांच्या वितरणाबाबत विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी याबाबत तयार करण्यात आलेलया धोरणात काही बदल करणे गरजेचे होते तेवढे बदल करण्याचा प्रस्ताव उपमुख्य अधिकारी (पु.गा. यांनी )सादर करावा अशा सूचना दिल्या.

मा. मुख्य अधिकारी यांनी सर्व सदस्यांना माहिती देताना सांगितले की, मुंबई शहरात आवश्यक तेवढे संक्रमण शिबीरात गाळे उपलब्ध आहेत / होणार आहेत. त्यामुळे उपनगरातील संक्रमण शिबीरे टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येणार आहेत.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

...oo...

**बाब क्रमांक १२१/२ (पुनर्विकास)**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९ ते ९७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

९१

सचिव यांनी उपरोक्त.२२ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१ भुकर पहाणी क्र.२५९-एफ/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३२१-एफ, इमारत क्र.६१३-ई डॉ बी.अे.रोड दादर (पुर्व) मुंबई- ४०० ०१४. "**विरदी हाऊस**" **(फ-उत्तर).**

२ भुकर पहाणी क्र.५०३ /१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१०, दादर माटुंगा इस्टेट, १६, के.आर सुब्रमण्यन रोड माटुंगा, मुंबई -१९ "**प्रतिभा बिल्डींग**" **(फ-उत्तर).**

३ भुकर पहाणी क्र.७५२-अे /१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५४८-अे दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१०, बी.एन.रोड माटुंगा, मुंबई -१९ "**देव रत्न**" **(फ-उत्तर).**

४ भुकर पहाणी क्र.२६१/१०, माटुंगा विभाग प्लॉट क्र.३२३-अे दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२२ डॉ.बी.अे.रोड, माटुंगा, मुंबई-१९ "**भगवती भुवन**" **(फ-उत्तर).**

५ अंतिम भुखंड क्र.९७-टी.पी.एस.३ माहिम विभाग, इमारत क्र.१२-अे, बाल गोवीन्दास रोड, माहिम, मुंबई-१६, "**नटराज वीला**" (ग-उत्तर).

६ भुकर पहाणी क्र.२२४ व १/२२४ लोअर परेल विभाग, इमारत क्र.२८-२८-अे, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३, "**तोडीवाला चाळ**" **(ग-दक्षिण).**

७ भुकर पहाणी क्र.६१/७४, ६१-अे/७४ व ६१-बी/७४ - परेल शिवडी विभाग इमारत क्र.३८३-अे, ३८३-बी, ३८३-सी, गणेश लेन, लालबाग, मुंबई - १२ "हरीदास मथुरादास चाळ" (फ-दक्षिण).

८ भुकर पहाणी क्र.३/२९६ ताडदेव विभाग, इमारत क्र.२७३ आणि २७३डी जावजी दादाजी रोड, ताडदेव, मुंबई- ४०० ००७. ''धरम कुटीर'' आणि ''**धरम निवास**'' (डी- २).

९ भुकर पहाणी क्र.१३३९ मांडवी विभाग इ.क्र.७६, कांम्बेकर स्ट्रिट, मुंबई येथील ''**राहिला मंझील**'' (बी).

१० भुकर पहाणी क्र.८०२ आणि ८०३ भायखळा विभाग, इमारत क्र.१६ आणि १४, उपकर क्र. इ-१२०७ आणि इ-१२०६, ३री कामाठीपुरा लेन.

११ भुकर पहाणी क्र. ४९५ गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१२७७(१-६) आणि डी-१२७७(३), इ.क्र. १४१ आणि १४१सी, व्ही.पी.रोड, मुंबई येथील ''**वाय. जी.जी. फडके ट्रस्ट**'' (डी).

१२ भुकर पहाणी क्र. ५३७ गिरगांव विभाग, इमारत क्र.२०, उपकर क्र. डी-९१८, सदाशिव क्रॉस लेन, मुंबई - ४०० ००४ येथील ''**अमृत निवास**'' (डी).

१३ भुकर पहाणी क्र.४२३ माझगांव विभाग, इ.क्र.२६, मातारपाखाडी रोड, मुंबई-१०. (ई-१).

१४ अंतिम भुखंड क्र.९३ व ९४ टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.१५ व १३ गणेश पेठ लेन, दादर (प) मुंबई-२८ "**अंबिका निवास व पाठारे भुवन**" **(ग-उत्तर).**

१५ भुकर पहाणी क्र.१८००, प्लॉट क्र.९०, शिवाजी पार्क स्कीम, इमारत क्र.९१-४०,डॉ.एम.बी.राऊत रोड, दादर (प), मुंबई-२८, "पारीजात बिल्डींग" (ग-उत्तर).

१६ भुकर पहाणी क्र.२/२६७, अंतिम भूखंड क्र.१११-टी.पी.एस-४, माहिम विभाग, इ.क्र.५५३-एफ व ५५३-डी, गणेश पेठ लेन, दादर (प), मुंबई-२८, "**इंदिरा कुंज विहार**" (ग-उत्तर)

१७ भुकर पहाणी क्र.२५३ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-७१५(१-२), इ.क्र.१५-१५ए, क्रातीविर राजगुरू मार्ग (भोरभाट लेन), मुंबई येथील ''**वंगाणी चेम्बर्स**'' (डी).

१८ भुकर पहाणी क्र.१०३४, १०३५ आणि १०३६ गिरगांव विभाग, इमारत क्र.१-३, १७७-१७९-१८१ आणि १७१, उपकर क्र.-२०७७(ए) आणि डी-२०७७(१), खेतवाडी बॅक रोड आणि खेतवाडी ११ वी गल्ली, मुंबई-४००००४, मुंबई येथील ''**बाणा**

**बिल्डींग", "रांगणेकर बिल्डींग" आणि "बाज बिल्डींग"** (डी).

१९ भुकर पहाणी क्र. १३१९ गिरगांव विभाग, इमारत क्र.१४डी आणि १४डीडी, उपकर क्र.डी-१११८ व डी-१११९(१) आणि डी-१११९(२), खोताचीवाडी (डी).

२० भूकर पहाणी क्र.२३२५, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४४९५ व सी-५१९६ इ.क्र.२-१६ आत्माराम मर्चंट रोड, १३१-१४५, भुलेश्वर रोड, भूलेश्वर, मुंबई-२. "राम मंदिर चाळ" (भिम श्रॉफ चाळ)

२१ भुकर पहाणी क्र.१२७९, मांडवी विभाग - उपकर क्र. बी-९५९ इ.क्र.२२-२८, कोळसा स्ट्रिट, (२-६, कोळसा स्ट्रिट क्रॉस लेन), मुंबई येथील सुफी मंझील (ताहिर मंझील) या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२२ भुकर पहाणी क्र. ५७६, गिरगाव विभाग - उपकर क्र. डी-१०७३ इ.क्र.३५, खोताचीवाडी, गिरगाव मुंबई.

<u>ठराव क्रमांक : १२१/ १०१३</u>

मुंबई बेटावरील खालील २२ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पहाणी क्र.२५९-एफ/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३२१-एफ, इमारत क्र.६१३-ई डॉ बी.अे.रोड दादर (पुर्व) मुंबई- ४०० ०१४. **"विरदी हाऊस" (फ-उत्तर).**

२ भुकर पहाणी क्र.५०३ /१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१०, दादर माटुंगा इस्टेट, १६, के.आर सुब्रमण्यन रोड माटुंगा, मुंबई -१९ **"प्रतिभा बिल्डींग" (फ-उत्तर).**

३ भुकर पहाणी क्र.७५२-अे /१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५४८-अे दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१०, बी.एन.रोड माटुंगा, मुंबई -१९ **"देव रत्न" (फ-उत्तर).**

४ भुकर पहाणी क्र.२६१/१०, माटुंगा विभाग प्लॉट क्र.३२३-अे दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२२ डॉ.बी.अे.रोड, माटुंगा, मुंबई-१९ **"भगवती भुवन" (फ-उत्तर).**

५ अंतिम भुखंड क्र.९७-टी.पी.एस.३ माहिम विभाग, इमारत क्र.१२-अे, बाल गोवीन्दास रोड, माहिम, मुंबई-१६, **"नटराज वीला"** (ग-उत्तर).

६ भुकर पहाणी क्र.२२४ व १/२२४ लोअर परेल विभाग, इमारत क्र.२८-२८-अे, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३, **"तोडीवाला चाळ" (ग-दक्षिण).**

७ भुकर पहाणी क्र.६१/७४, ६१-अे/७४ व ६१-बी/७४ - परेल शिवडी विभाग इमारत क्र.३८३-अे, ३८३-बी, ३८३-सी, गणेश लेन, लालबाग, मुंबई - १२ "हरीदास मथुरादास चाळ" (फ-दक्षिण).

८ भुकर पहाणी क्र.३/२९६ ताडदेव विभाग, इमारत क्र.२७३ आणि २७३डी जावजी दादाजी रोड, ताडदेव, मुंबई- ४०० ००७. "धरम कुटीर" आणि **"धरम निवास"** (डी- २).

९ भुकर पहाणी क्र.१३३९ मांडवी विभाग इ.क्र.७६, कांम्बेकर स्ट्रिट, मुंबई येथील **"राहिला मंझील"** (बी).

१० भुकर पहाणी क्र.८०२ आणि ८०३ भायखळा विभाग, इमारत क्र.१६ आणि १४, उपकर क्र. इ-१२०७ आणि इ-१२०६, ३री कामाठीपुरा लेन.

११ भुकर पहाणी क्र. ४९५ गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१२७७(१-६) आणि डी-१२७७(३), इ.क्र. १४१ आणि १४१सी, व्ही.पी.रोड, मुंबई येथील **"वाय. जी.जी. फडके ट्रस्ट"** (डी).

१२ भुकर पहाणी क्र. ५३७ गिरगांव विभाग, इमारत क्र.२०, उपकर क्र. डी-९१८, सदाशिव क्रॉस लेन, मुंबई - ४०० ००४ येथील **"अमृत निवास"** (डी).

१३ भुकर पहाणी क्र.४२३ माझगांव विभाग, इ.क्र.२६, मातारपाखाडी रोड, मुंबई-१०. (ई-१).

१४ अंतिम भुखंड क्र.९३ व ९४ टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.१५ व १३ गणेश पेठ लेन, दादर (प) मुंबई-२८ "**अंबिका निवास व पाठारे भुवन**" (ग-उत्तर).

१५ भुकर पहाणी क्र.१८००, प्लॉट क्र.९०, शिवाजी पार्क स्कीम, इमारत क्र.९१-४०,डॉ.एम.बी.राऊत रोड, दादर (प), मुंबई-२८, "पारीजात बिल्डींग" (ग-उत्तर).

१६ भुकर पहाणी क्र.२/२६७, अंतिम भूखंड क्र.१११-टी.पी.एस-४, माहिम विभाग, इ.क्र.५५३-एफ व ५५३-डी, गणेश पेठ लेन, दादर (प), मुंबई-२८, "**इंदिरा कुंज विहार**" (ग-उत्तर)

१७ भुकर पहाणी क्र.२५३ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-७१५(१-२), इ.क्र.१५-१५ए, क्रातीविर राजगुरू मार्ग (भोरभाट लेन), मुंबई येथील ''**वंगाणी चेम्बर्स**'' (डी).

१८ भुकर पहाणी क्र.१०३४, १०३५ आणि १०३६ गिरगांव विभाग, इमारत क्र.१-३, १७७-१७९-१८१ आणि १७१, उपकर क्र.-२०७७(ए) आणि डी-२०७७(१), खेतवाडी बॅक रोड आणि खेतवाडी ११ वी गल्ली, मुंबई-४००००४, मुंबई येथील ''**बाणा बिल्डींग**'', ''**रांगणेकर बिल्डींग**'' **आणि** ''**बाज बिल्डींग**'' (डी).

१९ भुकर पहाणी क्र. १३१९ गिरगांव विभाग, इमारत क्र.१४डी आणि १४डीडी, उपकर क्र.डी-१११८ व डी-१११९(१) आणि डी-१११९(२), खोताचीवाडी (डी).

२० भूकर पहाणी क्र.२३२५, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४४९५ व सी-५१९६ इ.क्र.२-१६ आत्माराम मर्चंट रोड, १३१-१४५, भुलेश्वर रोड, भूलेश्वर, मुंबई-२. "राम मंदिर चाळ" (भिम श्रॉफ चाळ)

२१ भुकर पहाणी क्र.१२७९, मांडवी विभाग - उपकर क्र. बी-९५९ इ.क्र.२२-२८, कोळसा स्ट्रिट, (२-६, कोळसा स्ट्रिट क्रॉस लेन), मुंबई येथील सुफी मंझील (ताहिर मंझील) या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२२ भुकर पहाणी क्र. ५७६, गिरगाव विभाग - उपकर क्र. डी-१०७३ इ.क्र.३५, खोताचीवाडी, गिरगाव मुंबई.

---

**बाब क्रमांक १२१/३** ( परिमंडळ -४ )

विषय- परीमंडळ-४ मधील फ/उत्तर विभागातील उपकरप्रापत इ.क्र.७३२, दिनशा हाऊस, विमला दलाल रोड, पारशी कॉलनी, दादर (पू) हया धोकादायक इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.९९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील उपकरप्रापत इ.क्र.७३२, दिनशा हाऊस, विमला दलाल रोड, पारशी कॉलनी, दादर (पू) हया धोकादायक झालेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१२,९९,२००/- व निव्वळ रक्कम रु.१२,९९,२००/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२१ / १०१४**

उपकरप्रापत इ.क्र.७३२, दिनशा हाऊस, विमला दलाल रोड, पारशी कॉलनी, दादर (पू) हया धोकादायक झालेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१२,९९,२००/- व निव्वळ रक्कम रु.१२,९९,२००/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२१/४**

**विषय-** पराणी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खिश्चन असेम्ब्ली हॉल अनिवासी ऐवजी निवासी दर लावणे व व्याजाची रक्कम माफ करणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १०१ ते १०५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती पराणी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खिश्चन असेम्ब्ली हॉल अनिवासी ऐवजी निवासी दर लावणे व व्याजाची रक्कम माफ करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १२१/ १०१५**

पराणी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील खिश्चन असेम्ब्ली हॉल अनिवासी ऐवजी निवासी दर लावणे व व्याजाची रक्कम माफ करणेबाबत.सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

बैठकीच्या अखेरीस बैठकीचे सचिव यांनी मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांचे अनुमतीने सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

५/१२/१०

सचिव/मु.इ.दु.व पु.मंडळ

५/१२/१०

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी
मुं.इ.दु.व पु.मंडळ